**आरबीआय/२००६-०७/११७**
**संदर्भ. डीजीबीए.सीडीडी. नं. एच-३२५३/१३.०१.२९९/२००६-०७**

२४ ऑगस्ट, २००६
भाद्र. २,१९२८(एस)

अध्यक्ष/व्यवस्थापकीय संचालक
स्टेट बँक ऑफ इंडिया/संलग्न बँका/
१७ राष्ट्रीकृत बँका/
एचडीएफसी बँक/आयसीआयसीआय बँक लि.
आयडीबीआय लि./युटीआय बँक लि.
स्टॉक होल्डींग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.

माननीय महोदय,

## गुंतवणुकदारांना त्यांच्या पसंतीच्या ठिकाणी अर्ध वार्षिक व्याज / मुद्दल / बचत रोखे आदी मिळणे बाबत.

सामान्यपणे, एजन्सी बँकांमध्ये, सहामाही व्याज किंवा अंतिम व्याजासह मुद्दलाची परतफेड वा व्याजासह बचत रोखे या सर्वांची देयके हि ज्या शाखेत गुंतवणुकदाराने गुंतवणुक केली असेल त्याच ठिकाणी दिली जातात. ग्राहक सेवेमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने, असा निर्णय घेण्यात आला आहे की, दुसऱ्या गावी राहणाऱ्या गुंतवणुकदारांच्या देयके / बचत रोखे मिळण्याच्या दृष्टीने, गुंतवणुक केलेल्या केंद्राशिवाय ग्राहकाच्या सोयीच्या, अन्य केंद्रामधूनहि त्यांना हि सेवा देण्याची सोय करण्यात यावी. आपल्या बँकेकडून त्यासाठी, आवश्यक दरमुक्त डिमांड ड्राफ्ट देण्यात यावा किंवा आपल्या बँकेचा, आपल्या कोणत्याही शाखेत वटणारा, सदर रकमेचा (ॲट पार) चेक देण्यात यावा. यापद्धतीची देयक सेवा आपल्या ग्राहकांना उपलब्ध होण्यासाठी आपल्या उपविधी १ए मध्ये आपण आवश्यक त्या दुरुस्त्या करुन घ्याव्यात.

आपला विश्वासु

(बी. बी. संगमा)
महाव्यवस्थापक